महाराष्ट्र शासन

# कर्मवीर मा.सां.कन्नमवार, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, चंद्रपूर

## Karmaveer M.S.Kannamwar Government Medical College, Chandrapur - 442401, Maharashtra, INDIA

**Telephone No. 07172- 277104** **Fax No. 07172- 277103**
**Website : www. gmcchandrapur.org** **Email – gmcchandrapur@gmail.com**

जा.क्र.शावैमवरुचं/आस्था-१,२/प्राध्यापकवसहयोगी प्राध्यापक (कंत्राटी) पदांची जाहिरात / 8958-62/२०२५ दि.21/११/२०२५

## जाहिरातीची सुचना

**विषय :-** वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अधिपत्याखालील कर्मवीर मा.सां.कन्नमवार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,चंद्रपूर येथील चिकित्सालयीन व अचिकित्सालयीन विविध विषयातील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक या संवर्गातील रिक्त पदे मध्यवर्ती निवड प्रक्रियेमार्फत ३६४ दिवसाकरीता करार तत्वावर तात्पुरत्या नियुक्तीने भरण्याबाबत..

**संदर्भ :-** १. शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.संकिर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि.१७.१२.२०१६
२. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्रमांक एलईसी-२०२१/प्र.क्र.१९९/ वैसेवा-३, दिनांक ०९.०२.२०२२.
३. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग शासन निर्णय क्र. एलईसी-२०२१/प्र.क्र.१८१/वैसेवा-३ दिनांक २१/०८/२०२४.

उपरोक्त विषय व संदर्भाधिन शासन निर्णयास अनुसरुन वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अधिपत्याखालील कर्मवीर मा.सां.कन्नमवार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, चंद्रपूर येथील चिकित्सालयीन व अचिकित्सालयीन विविध विषयातील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक या संवर्गातील रिक्त असलेली पदे मध्यवर्ती निवड प्रक्रियेमार्फत करार तत्वावर ३६४ दिवसांकरीता तात्पुरत्या स्वरुपाच्या नियुक्तीने भरण्याकरीता इच्छुक पात्र उमेदवारांकडुन अर्ज मागविण्यात येत आहेत.

त्यानुसार सदर जाहिरात व अर्जाचा नमुना मा. आयुक्त,वैद्यकीय शिक्षण व संशोधन आयुष, मुंबई यांच्या www.med-edu.in या संकेतस्थळावर व तसेच या कार्यालयाच्या www.gmcchandrapur.org या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला आहे. इच्छुक उमेदवारांनी सदर अर्जाचा नमुना डाऊनलोड (Download) करुन घ्यावा व सदज अर्ज अचूक व परिपूर्ण भरुन त्यासोबत जोडलेल्या यादीतील क्रमवारीनुसार आवश्यक त्या शैक्षणिक/अनुभव व इतर साक्षांकित प्रमाणपत्रे जोडून अर्ज कर्मवीर मा.सां.कन्नमवार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, चंद्रपूर येथे जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासुन दि. २४/११/२०२५ ते दि. ०५/१२/२०२५ या कालावधीत सकाळी ११.०० ते सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत ( शासकीय सुटटी वगळुन) या कार्यालयात प्रत्यक्ष अथवा पंजीकृत डाकेने सादर करण्यात यावा.

प्रत्यक्ष मुलाखत मा. अधिष्ठाता, कर्मवीर मा.सां.कन्नमवार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, चंद्रपूर ( अधिष्ठाता यांच्या दालनात) आयोजित करण्यात आलेली आहे. मुलाखतीचा दिनांक तसेच नियुक्तीबाबतची माहिती मा. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन आयुष, मुंबई यांच्या www.med-edu.in या संकेत स्थळावर व तसेच या कार्यालयाच्या www.gmcchandrapur.org या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल. मुलाखतीच्या वेळी उमेदवारांनी मुळ प्रमाणपत्रांसह साक्षांकित केलेल्या प्रतीसह थेट मुलाखतीच्या ठिकाणी स्वखर्चाने हजर राहावे. मुलाखतीस उपस्थित न राहिल्यास उमेदवाराचा कंत्राटी नियुक्तीकरिता विचार करण्यात येणार नाही.

(डॉ. मिलिंद कांबळे)
अधिष्ठाता
कर्मवीर मा.सां.कन्नमवार
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
चंद्रपूर.

( कृ.मा.प.)

Scanned with OKEN Scanner

## कर्मवीर मा.सां.कन्नमवार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, चंद्रपूर

रिक्त पदाचा तपशिल

संवर्ग : प्राध्यापक

| अ.क्र. | विषय | रिक्त पदे | शैक्षणीक अर्हता | अनुभव |
|---|---|---|---|---|
| "चिकित्सालयीन व अचिकित्सालयीन विषय" | | | | |
| १ | क्ष-किरणशास्त्र | १ | MD (Radiodiagnosis)/ MD Radiology)/ DNB(Radiodiagnosis)/ (Radiology) | As per NMC notification 30.06.2025 (a)i) Associate Professor in the subject for three years in a recognized medical institution Or ii) Specialist Medical Officer of the Armed Forces having at least three years of experience as Associate Professor in the relevant speciality in a teaching hospital of the Armed Forces; and . (b) i) have Published at least two research publication after becoming Associate Professor and must be amongst the first three authors; ii) have completed the basis course in Biomedical Research from a recognized medical institutions; and iii) shall be required to undergo Basic Course in Medical Education provided their broad speciality subject is covered under undergraduate training |
| २ | शरीररचनाशास्त्र | १ | M.D./M.S./DNB(Anatomy),MSc(Medical Anatomy) with PhD in Medical Anatomy | |
| ३ | स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र | १ | M.S.(Obstetrics and Gynecology)/ D.N.B. (Obstetrics and Gynecology) | |
| ४ | बधिरिकरणशास्त्र | १ | M.D./DNB(Anaesthesiology) | |
| ५ | औषधशास्त्र | १ | M.D./M.S./DNB(Pharmacology),MSc(Medical Pharmacology) with PhD in Pharmacology | |
| ६ | विकृतीशास्त्र | १ | M.D./DNB(Pathology) | |
| एकुण | | ६ | | |

टिप – सदर जाहिरातीमधील नमुद पद संख्येत बदल करणे/ सदरची जाहिरात पुर्णत: रदद करण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीतांनी स्वत:कडे राखुन ठेवला आहे.

(डॉ.मिलींद कांबळे)
अधिष्ठाता
कर्मवीर मा.सां.कन्नमवार
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, चंद्रपूर

(कृ.मा.प.)

Mahabharti.in

Scanned with OKEN Scanner

कर्मवीर मा.सां.कन्नमवार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, चंद्रपूर

रिक्त पदाचा तपशिल

संवर्ग :सहयोगी प्राध्यापक

| अ.क्र. | विषय | रिक्त पदे | शैक्षणीक अर्हता | अनुभव |
|---|---|---|---|---|
| | | | **"चिकित्सालयीन व अचिकित्सालयीन विषय"** | |
| १ | क्ष-किरणशास्त्र | १ | MD (Radiodiagnosis)/<br>MD Radiology)/<br>DNB(Radiodiagnosis)/ (Radiology) | As per NMC notification 30.06.2025<br>(a)i) Assistant Professor in the subject for four years in a recognized medical institution or for five years for those appointed directly as Assistant Professor in Government medical institution;<br>or<br>ii)a Specialist Medical Officer of the Armed Forces having at least five years of clinical experience in the relevant speciality after obtaining the recognized Postgraduate qualification in the subject, of which at least three years teaching experience as a Assistant Professor in a teaching hospital of the Armed Forces;<br>and .<br>(b) i) have Published at least two research publication after becoming Assistant Professor and must be amongst the first three authors;<br>ii) have completed the basis course in Biomedical Research from a recognized medical institutions designated by the Commission; and<br>iii) shall be required to undergo Basic Course in Medical Education provided their broad speciality subject is covered under undergraduate training |
| २ | स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र | २ | M.S.(Obstetrics and Gynecology)/<br>D.N.B. (Obstetrics and Gynecology) | |
| ३ | शरीरक्रियाशास्त्र | १ | Doctor of Medicine (M.D.) ( Physiology) **or** Diplomate of National Board ( Physiology) **or**<br>Bachelor of Medicine and Bachelor of Surgery with Master of Science ( Medical Physiology) **or**<br>Master of Science ( Medical Physiology) with Doctor of Philosophy ( Medical Physiology) **or**<br>Master of Science ( Medical Physiology) with Doctorate in Science ( Medical Physiology) | |
| ४ | रोगप्रतिबंधक व सामाजीक औषधशास्त्र विभाग | १ | A)Doctor of Medicine (M.D) (Preventive and Social Medicine) ;or<br>B) Doctor of Medicine(M.D) (Community Medicine); or<br>C) Doctor of Medicine (M.D) (Community Health Administration);or D) Doctor of Medicine (Health Administration) ; or<br>E) Diplomate of National Board (Preventive and Social Medicine); or (Community Medicine) | |
| | एकुण | ५ | | |

टिप - सदर जाहिरातीमधील नमुद पद संख्येत बदल करणे/ सदरची जाहिरात पुर्णत: रदद करण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीतांनी स्वत:कडे राखुन ठेवला आहे.

(डॉ.मिलींद कांबळे)<br>
अधिष्ठाता<br>
कर्मवीर मा.सां.कन्नमवार<br>
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, चंद्रपूर

Maharbharti.in

Scanned with OKEN Scanner

महत्वाची टिप :-

१. उमेदवार हा भारताचा नागरिक व महाराष्ट्रातील रहिवासी असावा.

२. उमेदवाराचे वय : नियुक्ती वेळेस ०१/०१/२०२५ रोजी कमाल ७० वर्षापेक्षा जास्त नसावे.

३. प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक यांना करार पध्दतीने नियुक्तीसाठी त्या-त्या पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या अध्यापकांबरोबरच कोणत्याही वयोगटाचे राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने विहीत केलेली आवश्यक अर्हता धारण करणारे खाजगी वा अन्य क्षेत्रातील उमेदवार (बिगर सेवानिवृत्त) पात्र असतील.

४. मानधन :

वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग शासन निर्णय क्र. एलईसी-२०२१/प्र.क्र.१८१/वैसेवा-३/ दिनांक - २१/०८/२०२४ नूसार खालील प्रमाणे दरमहा मानधन अनुज्ञेय राहील.

| अ.क्र. | पद | विषय | दरमहा मानधन |
|---|---|---|---|
| १. | प्राध्यापक | चिकित्सालयीन व अचिकित्सालयीन | रु. २,००,०००/- |
| २. | सहयोगी प्राध्यापक | चिकित्सालयीन व अचिकित्सालयीन | रु. १,८५,०००/- |

५. प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक पदासाठी अर्ज करणा-या अध्यापकांना nmc (राष्ट्रीय वैद्यकीय परिषद) च्या मानकानुसार कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे. तसेच भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मानकानुसार शोधनिबंध व इतर पात्रता आवश्यक.

५. गुणांकन पध्दत :- जाहीराती सोबत जोडलेल्या परिशिष्ठ-अ मध्ये नमूद करण्यात आलेले आहे.

(१) परिशिष्ट - अ मध्ये नमूद नुसार अ.क्र.१ ते ४ वरील एकुण-८५ गुणांच्या आधारे तात्पुरती गुणवत्ता यादी तयार करुन त्यानुसार उमेदवारांना प्रत्यक्ष कागदपत्र पडताळणी व मुलाखतीस पात्र ठरविण्यात येईल.

(२) प्रत्यक्ष कागदपत्र पडताळणी व मुलाखती अंती १०० गुणापैकी किमान ४१ % किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणा-या उमेदवारांचाच करार तत्वावरील नियुक्तीकरीता विचार केला जाईल.

नियम व अटी :-

१. करार पध्दतीने नियुक्तीचा कालावधी हा नियमित उमेदवार उपलब्ध होईपर्यंत ३६४ दिवसांचा कालावधी यापैकी जे अगोदर घडेल इतका राहील. तथापी सदरहू पदावर नियमित उगेदवार उपलब्ध झाल्यास कंत्राटी उमेदवाराच्या पदस्थापनेत बदल करुन देण्याचे अधिकार आयुक्त यांना राहील.

२. उमेदवाराचे कामकाज समाधानकारक नसल्यास, गंभीर स्वरुपाची अनियमितता व गैरवर्तणूक या कारणासाठी त्याची नियुक्ती कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय संपुष्टात येईल.

३. करार पध्दतीने नियुक्त उमेदवाराने प्रस्थापित मानकांनुसार अध्यापन, रुग्णसेवा व अधिष्ठाता यांनी नेमून दिलेली विवक्षित कामे पार पाडणे आवश्यक राहील.

४. वरीलप्रमाणे विहित कामकाज पार पाडल्यानंतर महाविद्यालयीन व रुग्णालयीन कर्तव्य व जबाबदा -यांवर विपरीत परिणाम होणर नाही याची दक्षता घेऊन उमेदवारास खाजगी वैद्यकीय व्यवसाय करण्याची मुभा राहील.

५. करार पध्दतीने नियुक्त उमेदवारांना नियमित नियुक्तीसाठी कोणताही हक्क राहणार नाही, तसेच सदर कालावधी कोणत्याही सेवा प्रयोजनासाठी ग्राहय धरला जाणार नाही.

६. करार पध्दतीने नियुक्त उमेदवारास त्याच्या सेवा कालावधीत केवळ नैमित्तीक रजा अनुज्ञेय असतील.

Mahabharti.in

Scanned with OKEN Scanner

७. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणा-या कागदपत्रे/माहिती व आधार सामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

८. करार पध्दतीने नियुक्ती करण्यात आलेल्या व्यक्तींनी कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रादान करता येणार नाहीत.

९. उमेदवारास नियुक्ती देण्यात आल्यानंतर किमान एक शैक्षणिक सत्र संपेपर्यंत त्यास कोणत्याही परिस्थितीत सेवा सोडता येणार नाही. तशा आशयाचे शपथपत्र उमेदवारास नियुक्तीपूर्वी सादर करणे बंधनकारक असेल. असे शपथपत्र सादर करणा-या उमेदवारासच करार पध्दतीने नियुक्ती देण्यात येईल. शैक्षणिक सत्र चालू असलेल्या कालावधीत विद्यार्थीहीत विचारात घेता उमेदवाराचा राजीनामा कोणत्याही परिस्थितीत स्विकारला जाणार नाही.

१०. बिगर सेवानिवृत्त गटातून करार पध्दतीने नियुक्त होणा-या अध्यापकाची नंतरच्या काळात नियमित नियुक्ती झाल्यास त्याला पूर्वीच्या सेवेचे कोणतेही लाभ अनुज्ञेय असणार नाहीत.

११. अर्जदाराने संबंधित पदासाठी शारीरीक दृष्ट्या पात्र असल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करावे.

१२. सदर जाहिरात मधील नमूद पदसंख्येत बदल करणे/सदरची जाहिरात पुर्णःरद्द करण्याचा अधिकार अधिष्ठाता यांनी स्वतःकडे राखून ठेवला आहे.

१३. नमूद रिक्त पदांच्या संख्येत बदल करणेबाबतचे सर्व अधिकार अधिष्ठातांना राहतील.

१४. अर्जदाराने त्यांच्या निवडीसाठी समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्षरित्या कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

१५. अर्जदाराचे नाव महाराष्ट्र वैद्यकीय मंडळ अधिनियम १९६५ च्या अंतर्गत कायम नोंदणी केल्याबाबतचे प्रमाणपत्र किंवा भारतीय वैद्यकीय परिषदेचे कायम नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

१६. उमेदवारांना मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. ( मुलाखतीचे वेळापत्रक वेगळयाने कळविण्यात येईल.)

१७. मुलाखतीला येतांना उमेदवारांनी Online सादर केलेल्या सर्व दस्तऐवजांचे मुळ कागदपत्रे सोबत आणणे बंधनकारक आहे.

(डॉ.मिलींद कांबळे)
अधिष्ठाता,
कर्मवीर मा.सां.कन्नमवार
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
चंद्रपूर

प्रति-

१) कार्यालयीन संकेतस्थळ,मा.आयुक्त (वैद्यकीय शिक्षण व संशोधन व आयुष) मुंबई.
२) सुचना फलक, कर्मवीर.मा.सां.कन्नमवार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,चंद्रपुर

प्रत माहितीस्तव -

१) मा. आयुक्त,वैद्यकीय शिक्षण व संशोधन,मुंबई यांना माहितीस्तव सादर.
२) संबंधीत प्राध्यापक व विभागप्रमुख ,कर्मवीर.मा.सां.कन्नमवार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,चंद्रपुर.
३. सर्व अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये यांना माहितीकरीता सादर.

Mahabharti.in
Scanned with OKEN Scanner